'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २९ (प्रतिनिधी) : जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील युवकांना रोजगार प्राप्त व्हावा या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने बीकॉम रिटेल मॅनेजमेंट, बी.कॉम. (बीएफएसआय), बीए ह्युमॅनिटीज अँड सिव्हिल सर्व्हिसेस, बी. एस्सी. अप्लाईड बॉयोलॉजी आणि बी.एस्सी. (ऑनर्स ) इलेक्ट्रॉनिक्स या पाच अप्रेंटिसशिप एम्बेडेड डीग्री प्रोग्राम ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनवून त्यांना अभ्यासक्रम शिकतांनाच प्रत्यक्ष उद्योग, बँक, शासकीय कार्यालय, व्यावसायातील कामकाजाचा अनुभव यावा, त्यांनी उद्योगात प्रशिक्षण घेत असतांना त्याचे विद्यावेतनही मिळावे याकरीता महाराष्ट्र शासन व विविध उद्योग व्यावसायिक संस्था यांच्या समवेत ९ सामंजस्य करार कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या उपस्थितीत करण्यात आले आहेत. या अभ्यासक्रमांचा तक्ता खालीलप्रमाणे

| अभ्यासक्रम | रोजगाराची संधी | विद्यावेतन (शासन धोरणानुसार) | करार करण्यात आलेली संस्था |
|---|---|---|---|
| बीकॉम रिटेल मॅनेजमेंट | बँक,रिटेल इंडस्ट्री, मेडीकल | रू. ९०००/- | जळगाव पिपल्स को.-ऑप. बँक, जळगाव<br>जळगाव जनता सह. बँक, जळगाव<br>प्रोग्रेसिव्ह ग्रोसर्स, जळगाव<br>आर.सी. बाफना ज्वेलर्स, जळगाव<br>दीपक मेडीकल्स, अमळनेर |
| बी.कॉम. बँकींग, फायनान्स, सर्व्हीसेस, इन्शुरन्स (बीएफएसआय) | बँक, विमा, वित्तीय संस्था, सेवाक्षेत्र | रू. ९०००/- | जळगाव पिपल्स को.-ऑप. बँक, जळगाव<br>जळगाव जनता सह. बँक, जळगाव<br>सेक्टर स्कील्स कौन्सीलद्वारा उद्योग संस्था |
| बीए ह्युमेनिटीज अँड सिव्हिल सर्व्हिसेस | शासकीय कार्यालय | रू. ९०००/- | जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव |
| बी. एस्सी. अप्लाईड बॉयोलॉजी | टिश्यु कल्चर, कृषी क्षेत्र | रू. ९०००/- | जैन इरिगेशन सिस्टीम लि. जळगाव<br>नॅचरली युवर्स बायोटेक, जळगाव |
| बी.एस्सी. (ऑनर्स) इलेक्ट्रॉनिक्स | विविध इलेक्ट्रॉनिक्स कंपनी | रू. ९०००/- | सेक्टर स्कील्स कौन्सीलद्वारा उद्योग संस्था |

वरीलप्रमाणे रोजगाराच्या संधी लक्षात घेवून विद्यार्थ्यांनी वरील अभ्यासंक्रमांना प्रवेश घ्यावेत त्याकरीता व माहितीसाठी डॉ. राजेश जवळेकर (संचालक, नवसंशोधन, नवोपक्रम व साहचर्य मंडळ) यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक 8788528860 वर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: २९ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता